# बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दि. २९ जानेवारी २०२३

### जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४५/२०२३ भादंविसक ३२४,३२३,५०४,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २९/०१/२०२३ रोजी सकाळी ०७.३० वा चे सुमारास, रमांजली चौक, देविदास मंडपवाला समोर, न्यु बुधवार पेठ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. २९/०१/२०२३ रोजी १२.५२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सुरेखा सुमेद कांबळे, वय- ४४ वर्षे, रा. रमांजली चौक, देविदास मंडपवाला समोर, न्यु बुधवार पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) हर्षल कुमार कांबळे, २) कुमार कांबळे, ३) लक्ष्मी कुमार कांबळे, ४) शालिनी गायकवाड, सर्व रा. न्यु बुधवार पेठ, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी या घराबाहेर चुलीवर पाणी तापवत बसल्या होत्या. त्यावेळी आरोपीत क्रं. १ हा रिक्षा घेवून जात असताना त्याच्या रिक्षाचा धक्का चुलीत असलेल्या बांबुला लागल्याने चुलीवर ठेवलेले पातेले खाली पडले. त्यावेळी रिक्षा आत बाहेर काढताना मला सांगचे तरी माझे पातेले खाली पडले असे फिर्यादी या म्हणाल्या असता त्यावेळी आरोपीत क्रं.१ याने फिर्यादीस शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यावेळी फिर्यादीचा मुलगा दिनेश घरातुन तेथे आला व आरोपीत क्रं. १ यास माझ्या आईला शिवीगाळ का करतो असे म्हणाला. त्यावेळी आरोपीत क्रं. १ याने शिवीगाळ करण्यास सुरुवात केली तेथे असलेले वरील आरोपीत क्र. २ ते ४ यांनी फिर्यादीस शिवीगाळ करण्यास सुरुवात करुन हाताने लाथाबुक्याने मारहाण केली. त्यावेळी फिर्यादीची मुलगी प्रिया, मुलगा गणेश हे भांडण सोडविण्यास मध्ये आले असता त्यांना वरील आरोपीतांनी सर्वांनी शिवीगाळ करुन, हाताने मारहाण केली. त्यानंतर आरोपीत क्रं. १ हा त्याचे घरातुन हातात कुऱ्हाड घेवून आला व फिर्यादीचा मुलगा दिनेश यास कुऱ्हाडीने पाठीवर मारुन दुखापत केली आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ५५७ गायकवाड |